## वेचक

### चिंचवली भाटरवाडी येथे विद्युत ट्रान्स्फॉर्मरचा उद्‌घाटन सोहळा संपन्न

**खेड (प्रतिनिधी) :** खेड तालुक्यातील चिंचवली भाटरवाडी येथे आज विद्युत ट्रान्स्फॉर्मरचा उद्‌घाटन सोहळा आमदार योगेश दादा कदम यांच्या हस्ते पार पडला. या कार्यक्रमाला चिंचवली गावातील ग्रामस्थ व मुंबईकर चाकरमानी देखील उपस्थित होते. चिंचवली गाव हा आजवर नेहमी शिवसेनेसोबत ठाम राहिला आहे. यापुढेही चिंचवली गावाने पक्षाची ताकत वाढवण्यासाठी प्रयत्न करावयाचे आहेत. या गावातील प्रत्येक विकासकामांची मागणी मी प्राधान्याने पूर्ण करत आहे आणि यापुढेही गावच्या विकासासाठी माझ्याकडून निधीची कमतरता भासू देणार नाही, असा शब्द यावेळी चिंचवली येथील ग्रामस्थांना दिला. या कार्यक्रमाला शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शशिकांत चव्हाण, तालुकाप्रमुख सचिन धाडवे, माजी सभापती रामचंद्र आईनकर, कौशल चिखले, स्वप्नील सैतवडेकर आदींसह शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सीएस एक्झिक्युटिव्ह परीक्षेमध्ये ‘ज्ञानदीप’च्या विद्यार्थ्यांचे यश

**खेड (प्रतिनिधी) :** ज्ञानदीप शिक्षण प्रसारक मंडळ खेड संचालित ज्ञानदीप महाविद्यालय मोरवंडे - बोरज येथील विद्यार्थ्यांनी सीएस एक्झिक्युटिव्ह या परीक्षेत यश संपादन केले. या परीक्षेसाठी महाविद्यालयातील अथर्व जोशी व विवेक पंदिरकर हे विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. दोघेही विद्यार्थी सीएस एक्सिक्युटिव्ह या परीक्षेमध्ये पास झाले. अथर्व जोशी याने ४०० पैकी २२२ गुण मिळवले तर विवेक पंदिरकर याने ४०० पैकी २०२ गुण मिळवून पुढील परीक्षेतील आपले स्थान पक्के केले. संस्थेचे सरचिणीस माधव पेठे व संस्थापक सरचिटणीस प्रकाश गुजराथी यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना प्रा. डॉ. उमेशकुमार बागल, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. श्रद्धा विचारे, प्रा. संजोग जाधव तसेच सर्व शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

### नवजीवन हायस्कूलमध्ये वक्तृत्व स्पर्धा

**खेड (प्रतिनिधी) :** तालुक्यातील शिव येथील नवजीवन हायस्कूलमध्ये वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. ही स्पर्धा दोन गटांमध्ये घेण्यात आली. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेसाठी विविध विषय देण्यात आले होते. लहान गटामध्ये प्रथम कांचन शिगवण (मला पडलेले स्वप्न), द्वितीय वृषाली शिंदे (पुस्तक प्रेमी डॉ. बाबासाहेब आंबेडकर), तृतीया समर्थ कर्जावकर (योगा असे जेथे आरोग्य वसे तेथे) मोठा गट प्रथम सिद्धी करजावकर (पुस्तक प्रेमी डॉ. बाबासाहेब आंबेडकर), द्वितीय तन्वी तांबे (इंटरनेट जवळचे दूर की दूरचे जवळ), तृतीया सिमरन तांबे (पुस्तक प्रेमी डॉ. बाबासाहेब आंबेडकर) स्पर्धेचे परीक्षण फातिमा पठाण, स्नेहल मानके दादासाहेब मुजावर , यांनी केले. स्पर्धेचे नियोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख समीर किरतकर व आय्युब मुतवल्ली यांनी केले. नियोजनानुसार तयारी भरत गावडे, विमल वारांगडे व महेंद्र धोत्रे यांनी केली. या कार्यक्रमाला प्रशालेचे मुख्याध्यापक इसहाक मणेर यांनी मार्गदर्शन केले.

### एसटीमध्ये चढणाऱ्या प्रवाशाच्या खिशातील पैसे चोरणाऱ्यास रंगेहाथ पकडले

**रत्नागिरी :** बसस्थानकात एसटी बसमध्ये शिरत असलेल्या प्रवाशाच्या खिशातून ५ हजार रुपये चोरणाऱ्या संशयितास पकडण्यात दापोली पोलिसांना यश आले आहे. दापोली पोलिस ठाण्यातून मिळालेल्या माहितीनुसार, बुरोंडी भांडारवाडा येथील दिगंबर मधुकर बुरोंडकर व त्यांची पत्नी कल्पना शुक्रवारी (ता. २५) दुपारी १.३० वा. दापोली बसस्थानकातून सुटणाऱ्या दापोली-बुरोंडी शीतलनगर या बसमध्ये चढत असताना त्यांच्या पँटच्या डाव्या खिशात कोणीतरी हात घालत असल्याचे त्यांना समजल्यावर त्यांनी खिशाला हात लावला असता त्यांच्यामागे असलेल्या इसमाने त्यांच्या खिशातील ५ हजार रुपये काढून घेऊन पळ काढला. बुरोंडकर यांनी चोर चोर असे ओरडण्यास सुरवात केल्यावर बसस्थानकात असलेल्या पोलिसांनी या चोराचा पाठलाग करून त्याला पकडले. अंकुश धोंडू झोरे असे या संशयित चोरट्याचे नाव आहे. दीपक बुरोंडकर यांनी दापोली पोलिस ठाण्यात चोरीची तक्रार दाखल केली असून, या तक्रारीनुसार संशयित अंकुश झोरे याच्या विरोधात दापोली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# चिपळूण शहर विकासासाठी शासनाकडून ६ कोटींचा निधी मंजूर

## आमदार शेखर निकम यांची पत्रकार परिषदेत माहिती

◆ **चिपळूण (प्रतिनिधी) :**

शासनाच्या ठोक तरतुदींतर्गत चिपळूण शहरासाठी एकूण ६ कोटींची विकासकामे मंजूर झाली आहेत. त्यामध्ये अल्पसंख्याक समाजातील कब्रस्तान, गांधारेश्वर, रामतीर्थच्या सुशोभीकरणासह विविध कामांचा समावेश आहे. शहरातील विविध विकासकामांसाठी आतापर्यंत एकून ३० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात यश आले असल्याची माहिती आमदार शेखर निकम यांनी सोमवारी येथे एका पत्रकार परिषदेत दिली.

ते पुढे म्हणाले की, शहरातील विविध विकासकामांना चालना देण्याच्या दृष्टीने आपण प्रयत्न केले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री उदय सामंत यांच्या माध्यमातून शहरातील प्रलंबित प्रश्नांमध्ये इंदिरा गांधी सांस्कृतिक केंद्राचा विषय मार्गी लागला आहे. यापुढील काळात मिनी थिएटर, पेठमाप-मुरादपूर पुलाच्या दोन्ही बाजूच्या ॲप्रोच रोडसह अन्य विकास प्रकल्पांचाही समावेश आहे. नुकताच शहर विकासासाठी सहा कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून त्यात अल्पसंख्याक समाजातील कब्रस्तानाचे सुशोभीकरण, रस्ते, पाखाडी गटारे, संरक्षण भिंत यासाठी २ कोटी ७५ लाखांच्या कामांना मंजुरी मिळाली आहे. त्याचबरोबर रामतीर्थ स्मशानभूमी सुशोभीकरण, गांधारेश्वर परिसर सुशोभीकरण व सर्व प्रभागातील विविध विकासकामांचा यामध्ये समावेश आहे.



शहरातील पार्किंगची वाढती समस्या दूर करण्यासाठी ६५ लाख रुपये मंजूर झाले असून सदर कामे ही प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आली आहेत. त्याचबरोबर अल्पसंख्याक विभागामार्पत ४० लाखांची कामे मंजूर करून ती सध्या सुरूही आहेत. दरम्यान, आमदार झाल्यानंतर २०१९ मध्ये पवन तलाव मैदान विकसित करण्याकरिता १ कोटी ५० लाख, गोवळकोट मैदानासाठी १ कोटी २५ लाख, पेठमाप मुरादपूर पूलासाठी १२ कोटी, नारायण तलाव सुशोभीकरणासाठी साडेतीन कोटी अशी एकूण आमदार झाल्यानंतर ३० कोटींची कामे शहर विकासासाठी मंजूर करण्यात यश आले असल्याचेही आमदार निकम यांनी सांगितले. यावेळी राष्ट्रवादी प्रदेश चिटणीस जयंद्रथ खताते, शहराध्यक्ष मिलिंद कापडी, उदय ओतारी, माजी नगराध्यक्षा रिहाना बिजले, वर्षा जागृष्टे, शिवानी पवार, आदिती देशपांडे आदी उपस्थित होत्या. या विकासकामांमुळे नागरिकांची होणारी गैरसोय थांबणार आहे.

> गतवर्षी ठोक तरतुदीतून शहरासाठी ३ कोटी ६० लाखांचा निधी मंजूर झाला आहे. त्यामध्ये सर्व प्रभागांमध्ये ओपन जीमसाठी ९० लाख, स्विमिंग पुलासाठी ७५ लाख, अण्णासाहेब खेडेकर क्रिडा संकूलात बॅडमिंटन कोर्टसाठी ५० लाख, फुलपाखरू उद्यान विकसित करण्यासाठीही निधी मंजूर आहे.

वहिवाटदारांच्या मदतीने मोजणी

# रत्नागिरी विमानतळ भूसंपादन प्रक्रिया पूर्णत्वाकडे

◆ **रत्नागिरी :**

रत्नागिरी विमानतळासाठीच्या भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण होत आली आहे. पाच गटांचे रेकॉर्ड जुळत नव्हते. त्यासाठी भूमिअभिलेख विभागाला घेऊन प्रांताधिकारी जीवन देसाई यांनी शुक्रवारी (ता. २५) वहिवाटदारांच्या मदतीने मोजणी केली. त्यामुळे आता विमानतळ विस्तारीकरणाचा मार्ग मोकळा झाला आहे. तिवंडेवाडी व मिरजोळे येथील एकूण क्षेत्र २७.९९.५९ हे. आर. जागा संपादित करण्यात आली आहे. एकूण ६५ कोटींपैकी ५० कोटींचे वाटप झाले असून, १५ कोटींचे लवकरच वाटप होणार असल्याचेही प्रांताधिकारी जीवन देसाई त्यांनी सांगितले. रत्नागिरी विमानतळ विकासासंदर्भात जमिनीचे भूसंपादन करणे व त्यासाठी आवश्यक निधीस प्रशासकीय व वित्तीय मान्यता शासनाने दिली आहे. रत्नागिरी विमानतळ पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यासाठी विमानतळाच्या तिवंडेवाडी व मिरजोळे (ता. रत्नागिरी) येथील एकूण क्षेत्र २७.९९.५९ हे. आर. संपादन करावयाचे येणार होते. त्या आनुषंगाने ४ ऑक्टोबर २०२२ ला शासन निर्णयानुसार सुधारित प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली होती. केंद्र शासनाच्या रिझनल कनेक्टिव्हिटी स्कीमअंतर्गत पहिल्या टप्प्यात रत्नागिरी विमानतळाचा समावेश करण्यात आला आहे.

हे विमानतळ भारतीय तटरक्षक दलाच्या ताब्यात आहे. विमानतळाची सद्यःस्थितीतील धावपट्टी १३७२ मी. (४५०० फूट) लांबीची आहे. तथापि, रिजनल कनेक्टिव्हिटी स्कीम योजनेअंतर्गत रत्नागिरी विमानतळ Bombardier / ATR ७२ प्रकारची विमाने वाहतुकीसाठी व इतर अनुषंगिक सेवा पुरवण्यास सक्षम व्हावे या दृष्टीने ही धावपट्टीची लांबी वाढवून ती २१३५ मी. (७ हजार फूट) करण्याची मागणी तटरक्षक दलाने केली होती.

### सावंतवाडी-दिवा गाडीसह रत्नागिरी पॅसेंजरला एसी डबा?

**खेड (प्रतिनिधी) :** कोकण रेल्वे मार्गावरील सर्वसामान्यांच्या हक्काच्या गाड्या असलेल्या सावंतवाडी दिवा सावंतवाडी एक्स्प्रेस तसेच रत्नागिरी-दिवा रत्नागिरी पॅसेंजर या दोन्ही गाड्यांचा प्रवास लवकरच ‘गारेगार होणार आहे’ कोकण रेल्वे या दोन्ही गाड्यांना प्रत्येकी एक ए.सी. चेअर कारचा प्रस्ताव पाठवण्यात आला आहे.

कोकण रेल्वे मार्गावरील सावंतवाडी दिवा सावंतवाडी एक्सप्रेस (१०१०५/१०१०६) दिवा- रत्नागिरी पॅसेंजर (५०१०३/५०१०४) या गाड्यांना एसी चेअर कारचा प्रत्येकी एक डबा जोडला जावा यासाठी कोकण विकास समितीने रेल्वेकडे पाठपुरावा सुरू ठेवला आहे.

यासाठी कोकण विकास समितीचे अध्यक्ष जयवंत शंकर दरेकर यांनी कोकण रेल्वेला पत्रही दिले आहे.

# रेशनिंगचा तांदूळ आरोग्याला पोषक !

## सहा पोषणमूल्ये असलेले तांदूळ : आता श्रीमंतही खाणार रेशनिंगचा तांदूळ

◆ **खेड (प्रतिनिधी) :**

सार्वजनिक वितरणाचे धान्य म्हणजे गोरगरिबाचे धान्य. त्यात ते निकृष्ट दर्जाचे असते, असा शिक्का आता पुसला गेला आहे. महागड्या सुवासिक तांदळापेक्षा जास्त पोषणमूल्ये असलेला 'फोर्टिफाइड' तांदूळ आता श्रीमंत लोकही खाणार आहेत.

एकेकाळी रेशनिंगचा लाल रंगाचा गहू आणि कुजलेला तांदूळ गोरगरीब रेशनधारकांना दिला जात होता. हे धान्य निकृष्ट दर्जाचे आहे, या गैरसमजाने लोक ते विकून दुकानांतून धान्य खरेदी करत होते. त्यामुळे रेशन धान्याचा मोठा काळाबाजार होत होता. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून केंद्र सरकारने रेशनिंगच्या एक किलो तांदळात दहा ग्रॅम फोर्टिफाइड पोषणमूल्ये असतात. तांदळाची पावडर करून त्यात पोषणमूल्ये टाकून हा तांदूळ तयार होतो. रंगाने पिवळसर व वजनाने हलका असल्याने ते पाण्यावर तरंगतात. शिजवताना आपण कायम शिजवतो. फोर्टिफाइड तांदूळ ओळखायला सोपा असल्याने काळाबाजार करणाऱ्यांना सहज पकडता येऊन काळा बाजार रोखला जातो.

भारतीय नागरिक व शालेय विद्यार्थ्यांचे मानसिक, शारीरिक आरोग्य तसेच रोग प्रतिकारक शक्ती वाढीसाठी पोषण व सुरक्षित आहार अंतर्गत सहा प्रकारचे सूक्ष्म पोषणमूल्ये असलेले तांदूळ तयार करून त्याचे वितरण सुरू केले आहे.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा तांदूळ हा सूक्ष्म पोषणमूल्ये टाकून तयार केला आहे.

> **असे आहेत पोषणमूल्ये**
> लोह (आय) अशक्तपणा दूर करते, लाल पेशींची कमतरता भरुन काढते. फोलिक ॲसिड- गर्भाचा विकास व नवीन रक्तपेशी तयार करते. व्हिटॅमिन बी १ मज्जा संस्था व मेंदूची कार्यक्षमता वाढते झिंक, व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन बी १, व्हिटॅमिन बी २, व्हिटॅमिन बी ५, व्हिटॅमिन बी ६ हे शारीरिक मानसिक क्षमता वाढवून रोग प्रतिकारक शक्ती वाढवतात.

### फुरुस येथे मटका-जुगार अड्ड्यावर धाड

**खेड (प्रतिनिधी) :** खेड तालुक्यातील फुरुस येथील स्वामी समर्थ वडापावच्या बाजूला बसथांब्यानजीक सुरू असलेल्या मटका-जुगार अड्ड्यावर येथील पोलिसांनी धाड टाकून ११२५ रुपये व जुगाराचे साहित्य जप्त केले. या प्रकरणी संजय धोंडू साळवी (रा. फुरुस-मोहल्ला) याच्यावर येथील पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


**परिवहन सेवा, ठाणे महानगरपालिका**

**ई-निविदा सूचना मुदतवाढ क्र.१**

ठाणे महानगरपालिका, परिवहन सेवेकडील टाटा मेक मॉडेलच्या BS III नामांकनाच्या डिझेल व सीएनजी इंधनावरील बसेस दुरुस्तीकरीता आवश्यक विविध प्रकारचे गॅसकेट (Brand-Banco, Talbros, Dina Seal) नामांकित मुळ उत्पादक, अधिकृत वितरक आणि पुरवठादार यांचेकडुन खरेदीसाठी Above/Below/At Par या तत्वावर एक वर्ष कालावधीकरीता जा.क्र.ठामपा/पिआरओ/टीएमटी/५४७/२०२३ दि.१७/०८/२०२३ नुसार मागविणेत आल्या होत्या. सदर निविदेस मुदतवाढ क्र.१ देणेत येत आहे. सदरील ई-निविदा सूचना व निविदा प्रपत्रे दि.०५/०९/२०२३ रोजी १५.०० वा. पर्यंत अधिकृत संकेतस्थळ https://mahatenders.gov.in वर उपलब्ध होतील, व शक्य झाल्यास प्राप्त निविदा दि. ०८/०९/२०२३ रोजी १६.०० वा. पर्यंत स्विकारलेल्या निविदा ऑनलाईन पध्दतीने उघडण्यांत येतील.

ठामपा/पिआरओ/परिवहन/५८८/२०२३-२४
दि.२८.०८.२०२३

सही/-
प्र. परिवहन उप व्यवस्थापक
परिवहन सेवा,ठा.मपा.ठाणे

PLS VISIT OUR OFF. WEBSITE
www.thanecity.gov.in

**मतदान केंद्रस्तरीय अधिकारी येत आहेत तुमच्या घरी,**
**आता मतदार यादीत दुरूस्ती करुन घेणं ही आपली जबाबदारी.. !**


### राजापुरात फॅशन डिझायनिंग प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

◆ **राजापूर (वार्ताहर):**

जिल्हा उद्योगकेंद्र पुरस्कृत मिटकॉन आयोजित राजापूर येथे सर्वसाधारण प्रवर्गातील सुशिक्षीत बेरोजगारांसाठी एक महिना कालावधीचे फॅशन डिझायनिंग प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

हे प्रशिक्षण विनामूल्य असून हे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या प्रशिक्षणार्थीला रुपये एक हजार विद्यावेतन व प्रमाणपत्र दिले जाणार आहे. यासाठी उमेदवार इयत्ता सातवी पास, जिल्ह्यातील रहिवासी व वयाची अठरा वर्षे पूर्ण ते ४५वर्षापर्यंतचा असावा. प्रशिक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्यांनी शाळा सोडल्याचा दाखला, आधारकार्ड, रेशनकार्ड, पासपोर्ट फोटो पासबुकची झेरॉक्स सत्यप्रत करून अर्जासोबत जोडावी.


**कुळगांव बदलापूर नगरपरिषद**

स्वच्छ भारत — एक कदम स्वच्छता की ओर
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**नगरपरिषद दुबे रुग्णालय इमारत, पहिला मजला, आदर्श विद्यामंदिर रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन-४२१५०३, ता. अंबरनाथ, जि. ठाणे.**
**ई-मेल- coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in**
**वेबसाईट : https://kbmc.gov.in**

**जा.क्र.कुबनप/वाहन/११/२०२३-२४** — **दिनांक- २८/०८/२०२३**

**जाहीर निविदा सूचना क्र १/२०२३-२४**

कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेच्या वाहन विभागामार्फत ०१ कामांसाठी महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदारांकडून टक्केवारी दराच्या ई-निविदा मागविण्यात येत आहेत. सदर ई-निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि. २९/८/२०२३ ते दि. ०८/९/२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत आहे व सदर निविदा शक्य झाल्यास दि. ११/९/२०२३ रोजी उघडण्यात येतील

निविदेबाबतचा सविस्तर तपशिल नगरपरिषदेच्या http://kbmc.gov.in तसेच शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर व नगरपरिषदेच्या सूचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**कुळगांव बदलापूर नगरपरिषद, कुळगांव**


# महामार्गावर गणेशोत्सवापर्यंत अवजड वाहतुकीला लागणार ‘ब्रेक’

◆ **खेड (प्रतिनिधी) :**

गणेशोत्सव ३ आठवड्यांवर येऊन ठेपला आहे. मुंबई-गोवा महामार्गाच्या रखडलेल्या रस्ता कामांचे युद्धपातळीवर काम सुरू आहे. मात्र, या कामात अवजड वाहनांच्या वाहतुकीचा ताण विशेषतः रायगड जिल्ह्यातील रस्ते कामावर येत आहे. या पार्श्वभूमीवर रविवारपासून ते २८ सप्टेंबरपर्यंत महामार्गावर अवजड वाहतुकीस बंदी घातल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी दिली.

मुंबई - गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम रखडले आहे. याशिवाय महामार्ग पुरता खड्ड्यातच गेला असून वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. अपघातातही वाढ होत आहेत. रस्त्यातच वाहने नादुरुस्त असून वाहतूक कोंडीचा प्रश्न देखील ऐरणीवर आला आहे. वाहनचालकांनाही भुर्दंड सहन करावा लागत आहे. गणेशोत्सवापूर्वी महामार्ग सुस्थितीत आणण्याच्या दृष्टीने सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी विशेष लक्ष केंद्रित करत ते सातत्याने पाहणी दौराही करत आहेत.

पनवेलपासून इंदापूरपर्यंतच्या महामार्गाच्या कामासाठी अत्याधुनिक सीटीबी यंत्रणा तैनात केली असून याद्वारे कामाला गती देण्यात आली आहे. मात्र, या कामात अवजड वाहनांच्या वाहतुकीचा अडथळा होत असल्याने रस्त्याच्या कामात खोडाच पडत आहे.

या पार्श्वभूमीवर २७ ऑगस्ट ते २८ सप्टेंबर या दरम्यान अवजड वाहनांच्या वाहतुकीस बंदी घातली आहे.

# खेडमधील रस्त्यांची दैना; पालिकेला जाग येईना !

## खड्डे देताहेत अपघाताला निमंत्रण; जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे, नागरिकांची मागणी

◆ **खेड (प्रतिनिधी) :**

शहरातील मुख्य रस्त्यासह अंतर्गत रस्त्यांचीही दयनीय अवस्था झाली असून नगर परिषदेला जाग येईना, अशी परिस्थिती सध्या निर्माण झाली आहे. पालिकेचा कारभार प्रशासकांकडून चालवला जातो. पण प्रशासकांना शहरातील जनतेच्या पायाभूत सुविधांबाबत मात्र आस्था दिसून येत नाही. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः याबाबतची दखल घेऊन खेड मधील बसस्थानक ते समर्थनगर मार्गाची झालेली दुरवस्था, नागरिकांना किमान पायाभूत सुविधा मिळतील, यासाठी काम करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे. स्वच्छ, सुंदर शहर अशी जाहिरात करून घेणाऱ्या खेड शहरातील खड्डे आता अपघाताला आमंत्रण देऊ लागले आहेत. बसस्थानक ते समर्थनगर रस्ता हा रोज गजबजलेला असतो.सुमारे पन्नासपेक्षा अधिक रिक्षा येथे उभ्या असतात. खेड रेल्वे स्टेशन व बसस्थानक येथून दररोज हजारो लोकांची शहरात ये-जा असते. या रस्त्याची पूर्णपणे चाळण झाली आहे. बसस्थानकाच्या मागील सुपरमार्केट गल्लीतील रस्त्यावरदेखील अनेक ठिकाणीं खड्डे पडले आहेत.

मीनाताई ठाकरे सांस्कृतिक केंद्र व भाऊसाहेब पाटणे व्यापारी संकुल यांच्यामधील रस्ता पादचाऱ्यांना चालण्या लायकदेखील राहिलेला नाही. रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. या खड्ड्यांमुळे ज्येष्ठ नागरिकांना अपघात होऊन दुखापत होण्याची भीती असते.शहराचा मुख्य महामार्ग अर्थात भरणे-खेड-दापोली मार्ग हा रस्ता कायम वाहतुकीला वर्दळीचा. परंतु, याच मार्गावरील गोळीबार मैदानापासून महाडनाका, बीएसएनएल, पंचायत समिती, एस. टी. स्टॅण्ड, तहसीलदार, पोलीस कार्यालयापासून थेट पालिका ऑफिस पुढे सुर्वे इंजिनिअर ते सहजीवन हायस्कूलपर्यंतचा रस्ताच गायब झालेला आहे.

> **डांबरीकरणाचे मूल्यमापन व्हावे**
> मुख्य रस्त्यासह अंतर्गत रस्त्याची स्थिती खड्यांमुळे अत्यंत चिंताजनक झालेली आहे. दरवर्षी डांबरीकरण कामासाठी कोट्यवधींचा निधी खर्च केला जातो. मात्र, या कामाचे मूल्यमापन होणे गरजेचे आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी यांनी याकडे लक्ष देण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

# कोकण कृषी विद्यापीठ आंतरराष्ट्रीय दर्जाचे बनविण्यात येणार

## कुलगुरू डॉ. संजय भावे सिडनीला रवाना

◆ **दापोली (प्रतिनिधी) :**

दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय भावे ऑस्ट्रेलिया येथील सिडनीस्थित वेस्टर्न सिडनी विद्यापीठात दाखल झाले आहेत. तेथे सुरू असलेले कृषी संशोधन, आधुनिक तंत्रज्ञान तसेच दोन्ही विद्यापीठांच्या समन्वयाने करण्यात येणाऱ्या शिक्षण आणि संशोधन कार्यक्रमांचे नियोजन या भेटी दरम्यान होणार आहे.

त्यांच्यासमवेत राष्ट्रीय कृषी उच्च शिक्षण प्रकल्प प्रमुख तथा विद्यापीठाचे शिक्षण संचालक डॉ. प्रशांत बोडके, डॉ. संतोष सावर्डेकर आणि डॉ. योगेश परुळेकर हेही सिडनी येथे दाखल झाले आहेत.या विद्यापीठाचे विद्यार्थी आणि दोन प्राध्यापक सिडनी येथे अध्ययन करण्यासाठी गेलेले आहेत. सिडनी येथे गेलेल्या प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांबरोबर डॉ. संजय भावे चर्चा करणार आहेत.

तसेच वेस्टर्न सिडनी युनिव्हर्सिटीमध्ये सुरू असलेले उपयुक्त संशोधन आणि आधुनिक तंत्रज्ञान हा दापोली कोकण विद्यापीठामध्ये कशा प्रकारे कृषी अवलंब करता येईल, याबरोबरच दोन्ही युनिव्हर्सिटीमध्ये परस्परसंबंध प्रस्थापित करणे, माहिती तंत्रज्ञानाचे आदान प्रदान करणे यासाठी सामंजस्य करार करण्यात येणार आहेत. त्यासाठी हा दौरा महत्त्वपूर्ण ठरणार आहे, दापोली कोकण कृषी विद्यापीठ आंतरराष्ट्रीय दर्जाचे बनविण्यासाठी सदैव प्रयत्न करण्याचे कुलगुरू यांनी अधोरेखित केले आहे. सर्व विद्यापीठ स्तरावर कुलगुरू डॉ. संजय भावे आणि सर्व सहभागी अधिकाऱ्यांचे अभिनंदन होत आहे.


**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सा.बा विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील नौपाडा-कोपरी प्रभाग समितीच्या सार्व. बांधकाम विभागामार्फत “रुग्णालये व दवाखाने दुरुस्ती” या लेखाशिर्षका अंतर्गत प्रभाग क्र.२२ (ड) मधील आंबेडकर रोड, दर्शन टॉवर येथील पशुवैद्यकीय विभागाचे कार्यालयामध्ये आवश्यक स्थापत्य कामे करणे या कामाकरीता नोंदणीकृत ठेकेदारांकडून ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. ज्या निविदाकारांवर शासकीय, निमशासकीय, सार्व. उपक्रम, स्थानिक संस्था महानगरपालिका ई.मार्फत नोंदणी रद्द करणेबाबत/काळ्या यादीत टाकणेबाबत कार्यवाही करणेत आली आहे अथवा प्रस्तावित आहे अशा निविदाकारांना निविदा भरता येणार नाही. निविदा सुचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in वर दि.२९/०८/२०२३ दि. ०५/०९/२०२३ पर्यंत उपलब्ध असून निविदा महापालिकेच्या सदर संकेतस्थळावर दि.०५/०९/२०२३ रोजी दुपारी १५.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. सदरच्या निविदा दि.०७/०९/२०२३ रोजी कार्यालयीन वेळेत सायंकाळी १६.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-नौ- को/५९७/२०२३-२४ **सही/-**
दि.२८.०८.२०२३
कार्यकारी अभियंता
ठाणे महानगरपालिका,ठाणे

Pls visit our oficial web-site
www.thanecity.gov.in

**मतदान केंद्रस्तरीय अधिकारी येत आहेत तुमच्या घरी,**
**आता मतदार यादीत दुरूस्ती करुन घेणं ही आपली जबाबदारी.. !**



**उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक**

UJJIVAN SMALL FINANCE BANK

**नोंदणीकृत कार्यालय :** ग्रेप गार्डन क्रमांक २७, ३ रा ए क्रॉस, १८ मेन, ६ वा ब्लॉक, कोरामंगला, बेंगळुरू ५६० ०९५, कर्नाटक
**विभागीय कार्यालय :** ७ वा मजला, अलमॉण्ट आयटी पार्क, अनुक्रमांक ८, खराडी मुंढवा बायपास, मौजे खराडी, पुणे ४११ ०१४.

**जाहीर लिलाव सूचना**

सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शिअल असेट्स अँड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा (सरफेसी ) २००२ अनुसार तसेच त्यासह वाचा सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम २००२ ची तरतूद ८ (६) व ९ अनुसार विक्रीकरिता जाहीर सूचना .
निम्नस्वाक्षरीकार जे उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड यांचे प्राधिकृत अधिकारी आहेत आणि त्यांनी खालील प्रमाणे नमूद केलेल्या मालमत्तांचा ताबा सरफेसी कायदा कलम १३ (४) अनुसार प्राप्त झालेल्या अधिकारांचा अवलंब करून घेतला आहे. कर्जदार विशेषतः आणि आम जनतेला या सूचनेच्या द्वारे कळविण्यात येते की खालील प्रमाणे नमूद केलेल्या मालमत्तांचा जाहीर लिलाव हा बँकेला येणे असलेल्या रकमेच्या वसुलीसाठी घेण्यात येत आहे आणि तो ‘जसे आहे जिथे आहे‘ आणि ‘जे आहे, ते आहे‘ तत्वावर खालील प्रमाणे नमूद केलेल्या तारखांना घेण्यात येणार आहे.

| अ. क्र. | कर्जखाते क्रमांक / शाखा | कर्जदार / सह कर्जदार / हमीदार / तारणदार यांचे नाव | १३(२) सूचनेची तारीख / येणे असलेली रक्कम (रुपयांत ) संबंधीत तारखेला | ताबा घेतल्याची तारीख | मालमत्तेची पाहणी करण्याची तारीख आणि वेळ | राखीव किंमत रुपयांत / ईएमडी रुपयांत | बोली आणि ईएमडी सादर करण्याची तारीख | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 4406210130000031 / 4406 - आकुर्डी | **१) श्री. उत्तम नामदेव जावीर २) श्रीमती छाया उत्तम जावीर** दोघेही राहणारः सदनिका क्र. ०३, यशवंत नगर, ब्लॉक क्र. ३ प्लॉट क्र. ८५, गंधाली अपार्टमेंट, तळेगाव स्थानकाजवळ, मावळ पुणे ४१०५०७ | **११.१०.२०२१/ २७.०९.२०२१ अनुसार रु. १७,४८,०२४/-** | १७.०३.२०२३ | ०८ सप्टेबर २०२३ आणि ११सप्टेंबर २०२३ रोजी स. ११ वा. पासून सायं. ०४.०० वा. पर्यंत | रु. १४,९६,०००/- रु. १,४९,६००/- | १८ सप्टेंबर २०२३ रोजी स. ११ वा ते सायं. ०५ वा. | २०.०९.२०२३ आणि स. ११.०० वा. ते सायं. २.०० वा. |

**स्थावर मालमत्तेचे वर्णनः** तळेगाव दाभाडे नगर परिषद हद्दीमधील आणि उप नोंदणीकरण मावळ ह्यांच्या हद्दीमधील गाव तळेगाव दाभाडे, तालुका मावळ, जिल्हा पुणे येथे वसलेल्या सीटीएस नोंदींच्या अनुसार ४६५.५ चौ. मी. मोजमाप असलेल्या सीटीएस क्र. ३७ ते ४५, प्लॉट क्र. ८५, तळेगाव स्थानकाजवळ असलेल्या मालमत्तेचा धारण केलेला सदनिका क्र. ०३, यशवंत नगर, ब्लॉक क्र. ३, प्लॉट क्र. ८५, गंधाली अपार्टमेंट चा सर्व खंड आणि भूखंड.

**अर्नेस्ट मनी डिपॉझिट (इरठे) आयएनआरमध्ये ("उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि." च्या नावे डिमांड ड्राफ्टद्वारे अदा केले जावे)**
**बोली सादर करण्याचे ठिकाण :** उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि. ऐश्वर्यम कॉम्फोर्ट दुकान क्र. १० आणि ११, थरमॅक्स शेजारी, अनु. क्र. १५२/४, सीटीएस ५१२०, खंडोबा मंदीरजवळ, आकुर्डी पुणे ४११०१९. **संपर्क व्यक्तीः** दीपक मंत्री - ८४८३८५६३२२, आनंद शॉ - ९८२०५ २६०४६, शिवजी खाडे - ७०५८०८०९१५.

**अटी आणि शर्ती :** इ लिलाव ‘जसे आहे जिथे आहे‘ आणि ‘जे आहे, ते आहे‘ तत्वावर घेण्यात येणार आहे.

१. प्राधिकृत अधिकारी यांच्या माहितीनुसार कोणत्याही मालमत्तेवर कोणत्याही स्वरूपाचा भार नाही. मात्र मालमत्तेचे हक्क, हक्क संबंध तसेच त्यावरील भार आदी यांची माहिती तसेच मालमत्तेच्या संदर्भातील दावे, हक्क देणी आदी यांची माहिती जाणून घेण्यासाठी इच्छूक खरेदीदार यांनी मालमत्तेच्या संदर्भात स्वतंत्र चौकशी बोली सादर करण्याच्या पूर्वी करावी. इ लिलावाची जाहिरात म्हणजे वचन किंवा बँकेचे प्रतिनिधत्वि नाही आणि असणार नाही. मालमता ही सध्याच्या आणि भविष्यातील भारांसह विक्री केली जात आहे जे बँकेला ज्ञात आहेत किंवा ज्ञात नाहीत. प्राधिकृत अधिकारी / संरक्षित धनको हे तृतीय पक्षकार यांचे हक्क, हक्क संबंध दावे अथवा देणी यांना जबाबदार असणार नाहीत.
२. बोली सादर करण्याच्या आधी मालमत्तेची चौकशी करणे आणि पाहणी करणे ही इच्छूक खरेदीदार यांची जबाबदारी आहे. लिलावासाठी ठेवण्यात आलेल्या मालमत्तांची पाहणी इच्छूक खरेदीदार यांना प्रत्येक मालमत्तेसमोर वरील प्रमाणे नमूद केलेल्या वेळेनुसार करता येईल.
३. इच्छूक खरेदीदार यांनी आपली बोली निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडे वरील प्रमाणे नमूद केलेल्या लिलावाच्या तारखेच्या आधी एक दिवस सादर करणे आवश्यक आहे.
४. इ लिलाव उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक मान्यताप्राप्त इ लिलाव सेवा पुरवठादार मेसर्स सी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्या माध्यमातून संपर्क व्यक्ती : विनोद चौहान (मो क्र ९८१३८८७९३१) यांच्याकडून घेण्यात येणार आहे. इच्छूक बोलीदार याना सल्ला देण्यात येतो की त्यांनी https://www.bankeauctions.com किंवा https://www.ujjivansfb.in/e-auctions येथे भेट देऊन मालमत्तेचा तपशील जाणून घ्यावा आणि बोली प्रक्रियेत सहभाग घेण्यासाठी आपली नावे नोंदविण्यासाठी https://www.bankeauctions.com येथे भेट द्यावी आणि युजर आयडी आणि पासवर्ड प्राप्त करून घ्यावा. इच्छूक खरेदीदार यांना इ लिलावाच्या संदर्भात ऑनलाईन प्रशिक्षण सेवा पुरवठादार मेसर्स सी १ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, हेल्प लाईन क्रमांक ७२९११९१८८२४, २५, २६ इ मेल आयडी support@bankeauctions.com, लिलाव पोर्टल https://www.bankeauctions.com येथे देण्यात येईल.
५. मालमत्तेची विक्री सर्वाधिक बोली सादर करणाऱ्याला करण्यात येईल मात्र ते संरक्षित धनको म्हणजेच उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड यांच्या मान्यतेस अधीन असेल. मात्र निम्नस्वाक्षरीकर यांना आवश्यकता भासल्यास इंटर से बिडिंग प्रक्रिया घेण्याचा नर्णिय घेण्याची मुभा आहे. बोली स्वीकारण्याचा तसेच कोणतेही कारण न देता कोणतीही बोली / निविदा नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार याना आहे.
६. यशस्वी बोलीदार यांचे ईएमडी विक्री किमतीचा भाग म्हणून राखून ठेवले जाईल आणि अयशस्वी बोलीदार यांचे ईएमडी परत देण्यात येईल. ईएमडी रकमेवर कोणत्याही स्वरूपाचे व्याज दिले जाणार नाही. यशस्वी बोलीवर यांना विक्री किमतीच्या २५ % रक्कम ईएमडी ॲडजेस्ट करून प्राधिकृत अधिकारी यांच्याकडून बोली स्वीकारली गेल्यानंतर २४ तासांत अदा करणे आवश्यक आहे. आणि विक्री किमतीच्या उर्वरित ७५% रक्कम विक्री निश्चित झाल्याच्या १५ दिवसात किंवा परस्पर सहमतीने ठरलेल्या दिवशी जो तीन महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही, त्या दिवशी प्राधिकृत अधिकारी यांनी मान्य केल्यानुसार अदा करणे आवश्यक आहे. यशस्वी बोलीदार यांनी वरील प्रमाणे नमूद केलेल्या अनुसार रक्कम अदा केली नाही या आधीच भरणा केलेली रक्कम जप्त होण्यास पात्र असेल आणि मालमत्ता पुन्हा इ लिलावाद्वारे विक्रीसाठी ठेवण्यात येईल आणि थकीत खरेदीदार यांचा मालमत्तेवर कोणताही अधिकार किंवा दावा करता येणार नाही.
७. ही सूचना महत्वाच्या मुद्यांना अनुसरून आहे.
८. बोलीदार यांनी आपल्या हितासाठी शेवटच्या क्षणी बोली लावणे टाळावे कारण खंडित वीज / खंडित इंटरनेट आदींसाठी उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक किंवा सेवा पुरवठादार जबाबदार असणार नाहीत. अशा घटना टाळण्यासाठी बोलीदार यांना आवाहन करण्यात येते की त्यांनी पॉवर सप्लाय बॅक अप आदींची सोय करून ठेवावी. ज्यायोगे जे लिलाव प्रक्रियेत विना अडथळा सहभाग घेऊ शकतील.

ही सूचना वरील प्रमाणे नमूद केलेले कर्जदार / हमीदार / तारण दार यांना तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीच्या वेळापत्रकाची सूचना आहे.

**स्थळ : पुणे**
**दिनांक : २८.०८.२०२३**

**स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी**
**उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक**